महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती, नागपूर/आस्था/परिपत्रक/1756/2025-26 दिनांक :- 28/05/2025

# UGC-NET/CSIR/MH-SET - 2025-26 परीक्षा पुर्व प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्रात रुजु होण्याकरीता विद्यार्थ्यांना सुचना

महाज्योतीमार्फत UGC-NET/CSIR/MH-SET-2025-26 परीक्षा पूर्व ऑफलाईन प्रशिक्षण 2025-26 करीता विद्यार्थ्यांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच सदर प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी दि.28/05/2025 पासून ते दि.10/06/2025 रोजी पर्यंत प्रशिक्षण केंद्रात प्रत्यक्ष जावून प्रवेश प्रक्रीया पुर्ण करुन घ्यावी.

- **प्रवेश प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे**:-

1. आधारकार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate)
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
4. पदव्युत्तर पदवीचे उत्तीर्ण गुणपत्रिका / प्रमाणपत्र

(मुळ कागदपत्रे व स्वयं स्वाक्षांकीत झेरॉक्स घेवून उपस्थित राहावे)

- **प्रशिक्षण केंद्रांचे नाव व पत्ता - संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे**:-

1. **सीआरजी ॲकडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र** -

**राहूल जाधव** - 7666878067/7499212562

**पत्ता** - 3 रा माळा, फडके हॉल, खजिना विहीर चौक, क्रांतीवीर वासूदेव फडके मार्ग, सदाशिव पेठ, पुणे - 411030

- **रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सूचना**:-

1. प्रशिक्षणास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, इत्यादी सोय स्वत:च करावी लागेल, याची नोंद घ्यावी.

2. ज्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC), केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) दिल्ली व महाराष्ट्र, महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट 'ब' व 'क', महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, Staff Selection Commission Combined Graduate Level (SSC-CGL), बँकींग (IBPS-PO) किंवा महाज्योतीच्या इतर योजनांचा लाभ घ्यायचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया करु नये. तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश रद्द किंवा इतर दुसऱ्या योजनेकरीता निवड करता येणार नाही.
3. कोणत्याही माध्यमातून व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी महाज्योतीच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी' या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
4. सदर संस्थेत दि.10/06/2025 पर्यंत तात्पुरत्या निवड यादीतील विद्यार्थी रुजु न झाल्यास प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना रिक्त जागेवर संधी देण्यात येईल.
5. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संबधित प्रशिक्षण संस्थेमार्फत कागदपत्रांची तपासणी करून प्रशिक्षणाकरीता प्रवेश देण्यात येईल.
6. सदर प्रशिक्षणाकरीता दुबार लाभासाठी अर्ज केलेल्या अपात्र विद्यार्थ्यांची यादी यासह प्रसिद्ध करण्यात येत आहे.
7. कोणत्याही कारणाने प्रशिक्षण केंद्रात बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

(स्वा.)
(विकास गडपायले)
**प्रकल्प व्यवस्थापक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर